# <u>दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळा</u>
# <u>“रीलिजिअस स्टडीज इन इंडिया (भारतीय अनुषंगाने धर्मांचा अभ्यास)”</u>

तत्वज्ञान विभाग, रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय आणि भक्तिवेदांत विद्यापीठ संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने रीलिजिअस स्टडीज इन इंडिया (भारतीय अनुषंगाने धर्मांचा अभ्यास) या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुश्री लोकुर तसेच भक्तिवेदांत विद्यापीठ संशोधन केंद्राचे संचालक गौरांग दास यांचे प्रोत्साहन व पाठिंबा लाभला. या कार्यशाळेला अमेरिकेतील इंडियाना विद्यापीठाचे रीलिजिअस स्टडीज या विभागाचे प्राध्यापक आणि विद्यमान अध्यक्ष श्री. डेव्हिड हेबरमन यांनी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर डॉ. अभिषेक घोष (ऑक्सफर्ड सेंटर, हिंदू शिक्षण केंद्र) यांनी या कार्यशाळेचे हेतू व उद्दिष्टे स्पष्ट केली. या कार्यशाळेत निरनीराळ्या विद्यापीठातील व महाविद्यालयातील प्राध्यापकांनी व तज्ञ शिक्षकांनी सहभाग नोंदवला होता.

या कार्यशाळेचा उद्देश महाविद्यालयातील धर्म शिक्षणाच्या सबंधित असणाऱ्या शक्यता यांचा अभ्यास करणे होता. या कार्यशाळेत धर्मांच्या बाबतीत असणाऱ्या मूल्यांचा आणि त्यातून होणाऱ्या समाजाच्या उन्नतीचा विचार करण्यात आला. त्याचबरोबर वैयक्तिक पातळीवर धर्मांसंबधी असणाऱ्या मूल्यांचा आदर व सन्मान कसा करावा याबाबतीत विचारमंथन करण्यात आले. भारतीय धर्मांचा इतिहास व त्याच्या मर्यादा यांबाबत तुलनात्मक अभ्यास करणे तसेच भारतीय धर्मांनी जगाला दिलेले योगदान यांचा विचार या कार्यशाळेत करण्यात आला.

विविध दृष्टिकोन, व्याख्या, सिद्धांत आणि पद्धती यांचा अभ्यास तसेच भारतीय विद्यापीठात धर्मांविषयीचे शिक्षण जास्तीत जास्त रुजवण्यासाठी कशा पद्धतीने अभ्यासक्रम तयार करता येईल याबाबत विचारमंथन करून या कार्यशाळेची सांगता झाली.

